मटा अँकर

## १३५३ सालापासूनच्या मोडी व संस्कृतमधील हस्तलिखितांची माहिती अभ्यासकांना मिळणार

# विद्यापीठातील सात हजार हस्तलिखिते ऑनलाइन

Udaysing.Patil
@timesgroup.com
Tweet : udaysingpatilMT



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने जतन केलेल्या १३५३ सालापासूनच्या मोडी व संस्कृतमधील हस्तलिखितांची (मॅन्युस्क्रिप्ट) माहिती आता जगभरातील अभ्यासकांना मिळणार आहे. केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट (एनएमएम) अंतर्गत विद्यापीठातील ७ हजार हस्तलिखितांची यादी संकेतस्थळावर देण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यामध्ये वेदांत, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, ज्योतिष, वैद्यक, इतिहास, पुराण, साहित्य, काव्य, नाटक, योग अशा विषयांवरील हस्तलिखितांचा समावेश आहे.

सरकारच्यावतीने राबवण्यात येत असलेल्या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत विद्यापीठातील सात हजार हस्तलिखितांची माहिती एकत्रित केली आहे. त्यासाठी मोडी व संस्कृतचे सर्व्हेअर काम करत होते. मध्यंतरी हा प्रकल्प सॉफ्टवेअरच्या अडचणींमुळे थांबला होता. पण २५ डिसेंबरपासून तो पूर्ववत सुरू झाला आहे. विद्यापीठातील काम पूर्ण झाल्याने आता या दोन भाषांचे सर्व्हेअर जिल्ह्यातील अन्य ठिकाणी व्यक्ती, संस्था, वाचनालयांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती घेत आहेत. आतापर्यंत १२ हजार हस्तलिखितांची नोंद करण्यात आली आहे. त्याची यादीही एनएमएमवर देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या संग्रहात असलेल्या हस्तलिखितांमधील अनेक हस्तलिखिते १३५३ च्या आसपासची आहेत. कोल्हापूरचे व्ही. एन. पंडितराव, पंडित बालाचार्य खुपेरकर शास्त्री, बी. एस. प्रधान, श्रीमंत गणपतराव राजोपाध्ये, तासगावचे प्राचार्य बी. ए. बाबर, मुंबईतील निर्णयसागर प्रेस यांनी दिलेल्या ६९२३ हस्तलिखितांचा समावेश आहे. अतिशय दुर्मिळ असलेल्या या हस्तलिखितांचे विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये संवर्धन करण्यात आले आहे. ज्यांना अभ्यासासाठी एखाद्या विषयांमधील, त्या परिसरातील जुनी माहिती हवी असल्यास ठिकठिकाणी पालथी घालावी लागत होती. तसेच संबंधित व्यक्ती, संस्थांना प्रत्यक्ष भेट द्यावी लागत होती. त्यामुळे अभ्यासाला प्रचंड वेळ लागत असते. आता एनएमएमच्या संकेतस्थळावर विषयानुसार त्यातील हस्तलिखितांची यादी देण्यात आली आहे. यामुळे एखाद्या विषयातील महत्वाची माहिती शिवाजी विद्यापीठातील हस्तलिखितामधूनही संशोधकाला मिळू शकते.





> विद्यापीठातील सात हजारांहून अधिक हस्तलिखितांची यादी एनएमएमच्या यादीमध्ये गेली आहे. त्याचा अभ्यासकांना मोठा उपयोग होऊ शकतो. याशिवाय जिल्ह्यात इतरत्र असलेल्या हस्तलिखितांचीही यादी तयार करण्यात येत असून १२ हजारांवर हस्तलिखितांची यादी तयार झाली आहे. त्यामुळे भविष्यात ठिकठिकाणचे संशोधक कोल्हापूरला येऊ शकतील.
>
> – डॉ. नमिता खोत, ग्रंथपाल, शिवाजी विद्यापीठ